

Read India
An Imprint of Pratham Books



# छुटकू कोळी

हरमिन्दर ओहरी



RGF Pratham
SERIES

Original Story (*English*) Spincy Spider by Herminder Ohri
© Rajiv Gandhi Foundation-Pratham Books, 2004

Second Marathi Edition: 2006

Illustrations: Herminder Ohri
Design: Moonis Ijlal
Marathi Translation: Avinash Pandit

ISBN: 81-8263-080-0



Registered Office:
PRATHAM BOOKS
9, Charles Campbell Road, Cox Town,
Bangalore 560 005
✆ 080-25801462, 25801463



Regional Offices:
Mumbai ✆ 022-65162526
New Delhi ✆ 011-65684113

Typesetting and Layout by:
Pratham Books


Printed by:
Repro India Ltd.
Mumbai





Some rights reserved. This book is CC-BY-3.0 licensed.
Full terms of use and attribution available at:
http://www.prathambooks.org/cc

# छुटकू कोळी



लेखन आणि चित्रांकन
हरमिन्दर ओहरी

मराठी रूपांतर
अविनाश पंडित

कोण्या एका वनात, काटेरी झाडीमध्ये एक छोटासा कोळी राहत होता. छुटकू कोळी असे त्याचे नांव होते. त्याच्या खापरपणजोबांनी त्यांच्या पणजोबांवर ‘छोटा महान कोळी’ या नांवाची कविता लिहिली होती. छुटकूने एकदा बोलण्याच्या भरात ही गोष्ट आपला किडा मित्र अटकू आणि अटकूचा भाऊ मटकू यांना सांगितली.





अटकू आणि मटकू यांच्या परिवारात कोणीही प्रसिद्ध नव्हते.

असल्या सर्व गोष्टींसाठी त्या किड्यांकडे वेळ तरी कुठे असतो?

ते आपले सकाळपासून रात्रीपर्यंत कामाला जुंपलेले असतात. खाण्याचे पदार्थ गोळा करणे आणि घरात मदत करणे. काम करताना कधीतरी दुखापत होण्याचा धोका देखील असतो.







छुटकूकडे तर फक्त दोन कामे होती. आपल्या घरासाठी जाळे विणणे आणि जाळ्यात माशी कधी अडकते याची वाट पाहणे.

छुटकूलासुद्धा प्रसिद्ध व्हायचे होते. पण प्रसिद्ध कसे व्हायचे ते त्याला माहीत नव्हते. तो सदानकदा याचाच विचार करत असे. एके दिवशी तो एका फांदीपासून दुसऱ्या फांदीपर्यंत जाळे विणत गेला. मग दुसऱ्या फांदीकडून तिसरीपर्यंत पोहचला.






असे करता करता त्याने दहा फांद्यांपर्यंत आपले जाळे गुंफले.पण त्याला प्रसिद्धी मिळाली नाही. त्याने त्याच्या मित्रांनासुद्धा प्रसिद्ध कसे व्हायचे याबद्दल विचारले. परंतु त्यांनाही माहीत नव्हते.



एके दिवशी भल्या सकाळीच अटकू आणि मटकू, छुटकूच्या घरी आले. त्यांनी छुटकूकरता एक माशी ही आणली होती. माशी मिळाल्यावर छुटकू अतिशय खूश झाला. त्याने आपल्या मित्रांचा उत्तम पाहुणचार केला. मग त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. अटकू व मटकू म्हणाले, ''छुटकू, एक गोष्ट सांगू ? प्रसिद्धी काय असते ते आम्हाला माहीत आहे.''

छुटकूचा आनंद गगनात मावेना. त्याच्या हातातून ती माशी जवळजवळ निसटून पडण्याच्या बेतात आली होती. छुटकू म्हणाला, ''अरे सांगा-सांगा, कुठे आहे प्रसिद्धी ?''






अटकूने बोलायला सुरूवात केली.
''माझा आणि मटकूचा एक मित्र आहे, मोती पोपट. तसा तो आमचा खास मित्र नाही.पण तो झाडावर फळे खातो तेव्हा आम्हाला त्याने कुरतडलेले तुकडे मिळतात. यावरून तो आमचा मित्र आहे असे तू म्हणू शकतोस.''

अटकू मोठा गप्पिष्ट आहे हे छुटकू जाणत होता. गप्पागोष्टी करताना अटकू थोडासा वाहत जातो आणि जे सांगायचे असते तेच विसरतो. म्हणूनच अटकूला अडवत छुटकूने विचारले, ''मोती पोपट ने प्रसिद्धी बद्दल काय सांगितले?''

अटकू उत्तरला, ''हो, तेच मी सांगत आहे. मोती पोपट माणसांमध्ये राहतो. ती माणसे प्रसिद्ध व्यक्तींबद्दल बोलत असतात.





म्हणून मोती म्हणतो
की तुम्ही असे काम करावे
जे कोणीही कधीही केले नसेल.
मग लोकांना तुमचे नाव कळते
आणि तुम्ही प्रसिद्ध होता.''
छुटकूला आपण काय करावे
तेच कळत नव्हते.
अटकूने छुटकूला समजावले.
''अरे, चिंता कशाला करतोस? तू बराच प्रसिद्ध आहेस. मी, मटकू, मोती पोपट आणि या झाडीतील सर्व कोळी तुझे नाव जाणून आहेत.''

छुटकूने जोरजोरात आपले डोके आणि आठही पाय हलवले.
''तसे नाही रे. माझ्यावर कोणीही कुठलीही कविता लिहिली नाही.''

अटकू आणि मटकू निमूटपणे तेथून उठून बाहेर गेले. आपल्या मित्राला प्रसिद्ध होण्याला ते कुठलीच मदत करू शकत नव्हते.





छुटकू बसून गंभीरपणे विचार करू लागला. आपल्याला असे कोणते काम करता येईल जे अन्य कोणत्याही कोळ्याने कधी केले नसेल.

छुटकू स्वत:शीच म्हणाला, ''आपण सुंदर जाळे विणतो.'' पण ते सर्वच कोळी करतात.

पुन्हा त्याने विचार केला.'आपण खूप जलद वर खाली हालचाल करतो.' पण सर्वच कोळी तसे करू शकतात.

तो असे कुठलेच काम करू शकत नव्हता जे दुसरे कोळी करू शकत नव्हते.

असे अनेक दिवस लोटले. छुटकू प्रसिद्ध झाला नाही.







एके दिवशी छुटकू आपल्या जाळ्यात बसला होता आणि त्याला अटकूच्या जोरात ओरडण्याचा आवाज ऐकू आला. ''छुटकू वाचव. मटकूला लागले आहे. वाचव, वाचव !''

छुटकू वाऱ्याच्या वेगाने तेथे धावत गेला.

छुटकूला मटकूवर एक मोठासा दगड पडला असल्याचे दिसले. त्या दगडाखालून मटकू कसातरी बाहेर पडला होता खरा पण त्याचा पाय तुटला होता. त्याच्या कंबरेलासुद्धा दुखापत झाली होती. मटकू पालथा पडला होता. अटकू आणि इतर किडे यांची एकच गडबड झाली होती.




छुटकूने सांगितले, ‘‘अटकू, चटकन एक लहानसे पान घेऊन ये.’’ अटकू पान घेऊन आला.

रात्र पडू लागली होती. अंधारामध्ये कोळ्यांना नीट दिसत नाही. यासाठी अटकूने आपल्या नात्यातील काजवाभाऊला बोलावले आणि ती जागा प्रकाशमान केली. छुटकूने पानातील शिरा मटकूच्या पायांना लावून त्यावर चहूबाजूंनी पान गुंडाळले. त्यावर तो धागा विणू लागला. अशा तऱ्हेने कोळ्याच्या रेशमी धाग्याची पट्टी नीट बांधली गेली.



यानंतर मटकूच्या कंबरेवर पान ठेवून त्यावरदेखील जाळे विणून छुटकूने पट्टी बांधली. अशाने मटकूला बराच आराम मिळाला. नंतर सर्व किडे त्याला त्याच्या घरी घेऊन गेले.

छुटकू बराच दमला होता. पण आपल्या मित्राचे प्राण वाचवल्याचा त्याला आनंद वाटत होता. छुटकू आपल्या घराच्या दिशेने चालू लागला त्यावेळी अनेक किडे त्याच्या बरोबर चालत त्याला साथ देत होते आणि अनेक काजवे त्यांच्यावर उडून वाटेतील अंधार दूर सारत होते.



ते सर्व मोती पोपटाने लिहिलेले गीत म्हणत होते.



प्रेमळ आमचा छुटकू कोळी,
मोठे त्याचे मन.
जेव्हा वाचवितो मित्राला,
जयजयकार करीती जन.

काही दिवसातच साऱ्या वनामध्ये छुटकूचे नांव दुमदुमायला लागले.

रोज संध्याकाळी काजवे त्या काटेरी जाळीमध्ये चमचम करू लागले की छुटकूच्या संबंधी गाणे गायले जाते. तुम्ही कधी वनामध्ये गेलात तर तुम्हाला देखील हे गाणे ऐकू येईल.

आणि छुटकूला स्वत:ला आता काय वाटते?

आपले नांव लोकांच्या कानी गेल्यामुळे छुटकू आनंदात आहे. परंतु तो म्हणतो, "मला या गोष्टीचा अधिक आनंद होतो की माझ्या मित्रांना जेव्हा मदत हवी असते तेव्हा ते माझे नांव प्रथम घेतात."



**वनामध्ये काटेरी झाडीत छुटकू कोळी राहात असे. आपले जगात नाव होण्यासाठी तो नाना प्रकारची कामं करत असे. जगात प्रसिद्ध होण्यासाठी अखेर त्याने कोणते काम केले?**
**'छुटकू कोळी' ही छुटकू कोळी आणि त्याचे मित्र यांची रंजक कहाणी आहे.**

*या मालिकेतील इतर पुस्तके*

रडी आणि ठुशी • नावेतील सहल
मोठे संकट • सुंदर जग

आमच्या वेगवेगळ्या भाषेतील शीर्षकांच्या संपूर्ण माहितीसाठी
**www.prathambooks.org** ला लॉगऑन करा.

प्रथम बुक्स ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि स्वस्त दरात भारतातील विविध भाषेत लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

ISBN 81-8263-080-0

Chutku Koli (Marathi)
Rs. 20.00